## मुक्त संचार गोठा पद्धतीद्वारे साधावी दुग्ध व्यवसायात प्रगती : कुलकर्णी



**नगर (प्रतिनिधी)** : शेतीला पूरक म्हणून नव्हे; तर आता दुग्ध व्यवसाय मुख्य उद्योग झाला आहे. मात्र अजूनही अनेक शेतकरी शास्त्रोक्त पद्धतीने दूध व्यवसाय करताना दिसत नाहीत. दूध व्यवसायात प्रगती साधायची असेल, तर मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करावा. चाऱ्याची बचत करण्यासाठी मुरघास तयार करावा, असे प्रतिपादन चितळे डेअरीचे विस्तार अधिकारी चंद्रशेखर कुलकर्णी यांनी केले.

नगर येथे सुरू असलेल्या 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनातील चर्चासत्रात रविवारी (ता. २५) चंद्रशेखर कुलकर्णी यांनी 'मुक्तसंचार गोठा आणि मुरघासनिर्मिती व दुधाळ जनावरे प्रजाती' या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कुलकर्णी म्हणाले, की शेतीला दुग्ध व्यवसायाचा मोठा आधार आहे. प्रत्येक शेतकऱ्याकडे दुभती जनावरे आहेत. मात्र दुग्ध व्यवसाय आता पारंपरिक पद्धतीऐवजी नव्या शास्त्रोक्त पद्धतीने करण्याची गरज आहे. एका जागी गोठ्यात जनावरे बांधून ठेवली, तर डासांचा प्रादुर्भाव होतो. जनावराची मानसिकता फारशी चांगली राहत नाही. शारीरिक व्यायाम होत आहे. त्या सगळ्या बाबीचा जनावरांच्या आरोग्यावर आणि परिणामी दूध उत्पादनावर परिणाम होतो. त्यामुळे दूध व्यवसाय फायदेशीर आणि चांगला करायचा असेल तर मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब गरजेचा आहे. त्यामुळे चाराही कमी प्रमाणात लागतो. चितळे डेअरीने राज्यातील दहा हजार जनावरांसाठी टॅगिंग केले असून, त्यामुळे प्रमुख बाबी त्या पशुपालकांना योग्य पद्धतीने हाताळता येत आहेत.

मुरघास हा दुभत्या जनावरांसाठी महत्त्वाचा आहे. एकाच वेळी मुरघास ४५ दिवस हवाबंद करून ठेवल्यावर जनावरे आवडीने खातात. त्यामुळे चारा आजिबात वाया जात नाही. मुरघासातून तीन टक्के शुष्क घटक मिळतो. दररोज जनावरांना साधारण दहा किलो मुरघास दिल्यास दूध उत्पादनात वाढ होतेच, पण जनावरांचे आरोग्य सुधारते. मका, ज्वारी, बाजरी, ओटस, गवतवर्गीय पिके, हरभरा, सोयाबीन, ल्युसर्न, बर्सिम, टाकाऊ पालेभाज्या याचा मुरघास करता येतो. या वेळी कुलकर्णी यांनी राज्यातील विविध भागांत सुरू असलेल्या मुक्तसंचार गोठा, मुरघास करण्याची प्रात्यक्षिके दाखवली.

# 'अॅग्रोवन कृषी प्रदर्शना'चा नगर येथे उत्साहात समारोप

**नगर (प्रतिनिधी)** : येथील सावेडीतील जागिंग पार्क मैदानावर सुरु असलेल्या 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनाचा रविवारी (ता. २५) समारोप झाला. या कृषी प्रदर्शनात नगर शहर, जिल्ह्यासह शेजारच्या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत नवीन तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली.

नगर येथे आयोजित सकाळ-अॅग्रोवन कृषी प्रदर्शनाचे चितळे जिनस एबीएस (इंडिया) सहप्रायोजक होते. या तीनदिवसीय प्रदर्शनात विविध ५० स्टॉल्स होते.

ट्रॅक्टर्स, हार्वेस्टिंग यंत्रे, विविध अवजारे, कापणी यंत्रे, जैविक कीडनाशके, विद्राव्य खते, ग्रीन हाउस टेक्नॉलॉजी, पॉलिहाउस, ठिबक तुषार संच, कृषी साहित्य प्रकाशन, रोपवाटिका, प्रक्रिया उद्योग, खते, अत्याधुनिक कडबाकुट्टी आदी स्टॉलचा यात समावेश होता. चितळे दूधतर्फे मुक्त संचार गोठा व मुरघास निर्मिती, दुधाळ जनावराच्या प्रजाती, सेंद्रिय शेतीची गरज, मार्केटिंग व ब्रॅंडिंग व्यवस्थापन आदी महत्त्वपूर्ण विषयावर शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, डाळिंब निर्यात, किफायतशीर ऊस उत्पादन या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रदर्शनाला नगर, औरंगाबाद, बीड, सोलापूर, उस्मानाबाद भागांतील शेतकऱ्यांनी भेटी दिल्या. रविवारी प्रदर्शनाचा समारोप झाला.



**नगर : सकाळ-अॅग्रोवन कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरवरील फवारणी यंत्राची माहिती जाणून घेतली.** (छायाचित्र : **सूर्यकांत नेटके**)

> 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी मी बीड जिल्ह्यातून आलो. येथे मला चांगली आणि शेतीसाठी फायदेशीर असणारी माहिती मिळाली. चांगली आणि किफायतशीर शेती करायची असेल, तर तंत्रज्ञान जाणून घेतले पाहिजे. प्रदर्शनातून बऱ्याच बाबी समजल्या.
>
> **– भगवानराव कुलथे,** शेतकरी, पाडळी, ता. शिरुर कासार, जि. बीड

## कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांनी जाणून घेतले तंत्रज्ञानातील बारकावे

**नगर (प्रतिनिधी)** : येथे 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध स्टॉलमधून शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण माहिती मिळाली. त्यामुळे प्रदर्शनात सहभागी झालेला प्रत्येक शेतकरी समाधानी असल्याचे स्टॉलधारकांनी सांगितले. शेतकरी स्वतः तंत्रज्ञानातील विविध बाबींचे बारकावे जाणून घेत असल्याचे दिसून आले.

नगर येथील सावेडीतील जॉगिंग पार्क मैदानावर 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. चितळे जिनस एबीएस (इंडिया) प्रदर्शनाचे सहप्रायोजक आहेत. प्रदर्शनात सहभागी झालेल्या तिरुमला ऑइलचे मराठवाडाचे सेल्स मॅनेजर महादेव दाभाडे आणि नगर जिल्ह्याचे प्रतिनिधी गणपत हंडे यांनी सांगितले, की सनफ्लॉवर, राइस ब्रान, सोयाबीन, शेंगदाणा, पाम, कॉटन (सरकी) असे सहा प्रकारचे खाण्याचे दर्जेदार तेल उपलब्ध आहे. पन्नास मिलिपासून पंधरा लिटरच्या पॉकिंगमध्ये त्याची विक्री केली जाते. येथे येणाऱ्या शेतकऱ्यांनी या तेलाचे फायदे विचारून माहिती घेतली.

पिकांना तापमान व अन्य बाबीपासून संरक्षण देणाऱ्या सीडवीनच्या ग्रो कव्हरच्या मिनी पॉलिहाउसमध्ये टोमॅटो, मिरची, फ्लॉवर, ढोबळी मिरची आदी भाजीपाला पिकांसह टरबूज, खरबूज आदी पिकांचे उत्पादन घेता येते. द्राक्ष, डाळिंब, केळी, पपई आदी फळपिकांना ग्रो कव्हरचे संरक्षण देता येते. पॉलिहाउसमुळे पिकांच्या वाढीसाठी योग्य तापमानाची निर्मिती करता येते. पक्षी, किडींपासून संरक्षण करता येते. अतिथंडी, उन्हापासून (सनबर्निंग) पिकांचे संरक्षण होते. बाष्पीभवनाचा वेग कमी होतो. पाण्याची बचत होते. केळीच्या घडांवर, डाळिंब, पपई, आंबा, खजूर, द्राक्ष आदी फळांना ग्रो कव्हरचे आवरण घातल्यास उन्हामुळे संरक्षण होते. काळे डाग पडत नाहीत. फळांची चकाकी कायम राहत असल्यामुळे चांगला बाजारभाव मिळतो. यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो. राज्यातील शेतकरी ग्रो कव्हरचा वापर करू लागले आहेत. मात्र नकली ग्रो कव्हरपासून शेतकऱ्यांनी सावध राहावे, असे मार्केटिंग व्यवस्थापक अनिल राजवैद्य यांनी सांगितले.

मळणीयंत्रासह ट्रॅक्टर व इतर अवजारांना मागणी वाढू लागली आहे. अभय मशिनरीकडून मळणीयंत्र, रोटावेटर, कडबाकुट्टी, गिरणी, सबमर्सिबल पंप आदी साहित्याची शेतकऱ्यांनी माहिती घेतली. अनेक शेतकऱ्यांनी या मळणीयंत्र, रोटावेटर, कडबाकुट्टी, गिरणीला पसंती दिली असून, शेतकऱ्यांनी याबाबत माहितीही घेतली असल्याचे सर्व्हिस इंजिनिअर सतीश शेळके यांनी सांगितले.

जालन्याच्या जे. के. टेक्नोप्लास्टच्या पीव्हीसी पाइपचा दर्जा शेतकऱ्यांनी जाणून घेतला. सध्या शेती विकासासाठी पाइपलाइनला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे जे. के. पाइप फायद्याचा आणि किफायशीर कसा आहे, याबाबत माहिती जाणून घेतली. प्रदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांना माहिती मिळाली, असे सांगण्यात आले.

राज्यात अलीकडे डाळिंबासह फळशेतीवर भर दिला जात आहे. डाळिंब फळातील पराग निलाका (कळी) लांबवून मादी फुलांची संख्या वाढविणारे संपूर्ण वनस्पतिजन्य उत्पादनवाढीसाठी, विविध पिकांवरील अनेक रोगांवर उपाय असलेले किटोसान, द्राक्षासाठी फायदशीर असलेले सिलामोल, डाळिंबावरील तेलकट डाग रोगावर उपाय करणारे क्रिल, फळपिकांवरील विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व्हेट, पिकांसाठी पाण्यात विरघळणारी टेक्निकल पावडर या वैष्णवी बायोटेक कार्पोरेशनच्या उत्पादनाची शेतकऱ्यांनी माहिती जाणून घेतली. या उत्पादनाला शेतकरी चांगला प्रतिसाद देत असल्याचे सांगण्यात आले.

## 'किफायतशीर ऊस शेतीसाठी व्यवस्थापन महत्त्वाचे'

**नगर (प्रतिनिधी)** : देशासह राज्यातील अनेक भागांत ऊस हे महत्त्वाचे पीक आहे. मात्र, आजही अनेक ठिकाणी उसाची शेती खर्चिक आहे. खर्चाच्या सहा पट उत्पादन निघाले तर ऊसशेती किफायतशीर आहे. ऊस शेती फायद्याची करायची असेल तर पाणी, खतासह पीक व्यवस्थापन महत्त्वाचे आहे, असे मत वसंतदादा पाटील शुगर इन्स्टिट्युटचे माजी संचालक, ऊसतज्ज्ञ डॉ. ज्ञानदेव हापसे यांनी व्यक्त केले.



**नगर : चर्चासत्रात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्ञानदेव हापसे.**

नगर येथे सुरू असलेल्या 'सकाळ-अॅग्रोवन' कृषी प्रदर्शनात शनिवारी (ता. २४) उसाचे एकरी दीडशे टन किफायतशीर उत्पादन तंत्र या विषयावर डॉ. हापसे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, की देशात महाराष्ट्रात उसाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जात होते. नगर जिल्हाही ऊस उत्पादनात आघाडीवर होता. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. व्यवस्थापनातील अडचणी उस उत्पादन वाढीला अडथळा ठरत आहेत. उसाचे उत्पादन वाढीसाठी व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. लागवड करताना पाच ते सात फुटाची सरी काढून दोन उसातील अंतर दोन फुटाचे राहील अशी लागवड करावी. लागवडीआधी व्यवस्थापन योग्य राहील यासाठी जमिनीची सुपीकता तपासावी. जैविक, रासायनिक व त्यासोबत सेंद्रिय कर्ब पाहणे महत्त्वाचे आहे. ऊस उत्पादन घेताना ठिबकचा वापर महत्त्वाचा आहे. खताची मात्रा देताना लागवड पद्धतीचा विचार करूनच द्यावी. उसाची शेत चांगले तणमुक्त राहण्यासाठी आंतरपीक महत्त्वाचे आहे. शक्य तेवढा सेंद्रिय खताचा वापर केला तर जमिनीचा पोत सुधारण्याला मदत होते. पाचटाचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करावा. साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याचीही गरज आहे. उसाची शेती करताना व्यवसाय आणि व्यापारी दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.